# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.07.2025** **वारःशनिवार**

---

1. रोजगार मेळाव्यात आज दूरस्थ पद्धतीनं 51 हजारांहून युवकांना नियुक्ती पत्रं
2. अहमदाबाद विमान अपघात प्रकरणी प्राथमिक तपास अहवाल प्रकाशित
3. स्वदेशी बनावटीच्या अस्त्र क्षेपणास्त्राची यशस्वी उड्डाण-चाचणी
4. महाराष्ट्रातील 11 शिवकालीन किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा स्थळाचा दर्जा
5. भारतीय वीर नायक यशवंत घाडगे यांच्या कास्य पुतळ्याचं इटलीमधल्या मॉन्टोन शहरात अनावरण आणि
6. भारत-इंग्लंड तिसरा कसोटी क्रिकेट सामना चुरशीच्या टप्प्यावर.

**<u>रोजगार मेळावा</u>**

विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्यानं नियुक्त झालेल्या 51 हजारांहून अधिक युवकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरस्थ पद्धतीनं नियुक्ती पत्रं वितरित करणार आहेत. हा देशव्यापी 16 वा रोजगार मेळावा 47 ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. पुण्यातल्या रोजगार मेळाव्यात नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्रं देण्यात येतील. देशभरात आतापर्यंत झालेल्या रोजगार मेळ्यांद्वारे 10 लाखांहून अधिक नियुक्ती पत्रं जारी करण्यात आली आहेत.

**<u>विमान अपघात तपास</u>**

अहमदाबादमध्ये गेल्या महिन्यात झालेल्या एअर इंडिया विमान अपघात प्रकरणी विमान अपघात तपास यंत्रणेनं काल 15 पानांचा प्राथमिक अहवाल प्रकाशित केला आहे. उड्डाण सुरू झाल्यानंतर काही सेकंदातच विमानाचं इंजिन इंधन नियंत्रण 'RUN' मोड वरून 'CUTOFF' स्थितीत गेलं आणि बंद झालं, परिणामी ही दुर्घटना घडली असं या अहवालात म्हटलं आहे. या अपघातात 260 जणांचा मृत्यु झाला. दरम्यान, या विमान अपघाताच्या चौकशीत अधिकाऱ्यांना सहकार्य करत राहू, असं एअर इंडियानं सांगितलं आहे.

**<u>डीआरडीओ</u>**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था म्हणजेच डीआरडीओ आणि भारतीय वायु दलानं स्वदेशी बनावटीच्या अस्त्र क्षेपणास्त्राची काल यशस्वी उड्डाण-चाचणी घेतली. ओडिशामधल्या चाचणी स्थळावरून या नजरेत न येऊ शकणाऱ्या आणि हवेतून हवेत मारा करू शकणाऱ्या क्षेपणास्त्राची उड्डाण चाचणी घेण्यात आली. या चाचणीदरम्यान वेगवेगळ्या पल्ल्यांच्या आणि उच्चगती मानवरहित हवाई लक्ष्यांवर प्रक्षेपण करण्यात आलं, असं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं.

**अजित डोवाल**

ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारतानं पाकिस्तानमधल्या नऊ दहशतवादी तळांवर  हल्ला केला, हे हल्ले इतके अचूक होते की भारतीय सशस्त्र दलांना कोण कुठे आहे हे माहित होते आणि क्षेपणास्त्रे लक्ष्यांशिवाय इतर कुठेही डागली गेली नाहीत, असं  राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी सांगितलं. ते काल चेन्नई इथल्या आयआयटी मद्रासच्या 62 व्या वार्षिक दीक्षांत समारंभात भाषण देताना बोलत होते. ऑपरेशन सिंदूरबद्दल चुकीची माहिती पसरवल्याबद्दल परदेशी माध्यमांवरही डोभाल यांनी यावेळी टीका केली. 23 मिनिटांत अचूक हल्ले करून दहशतवादी तळ उद्ध्वस्त केल्याबद्दल राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणेनं भारतीय सशस्त्र दलांचं कौतुक केलं.

**एनआयए**

राष्ट्रीय तपास संस्थेनं आयसिसच्या पुणे छुपा हस्तक प्रकरणात हवा असलेल्या एका दहशतवाद्याला अटक केली आहे. हा 11 वा आरोपी रिझवान अली यानं अन्य 10 जणांच्या मदतीनं देशातलं वातावरण अस्थिर करण्यासाठी आणि सांप्रदायिक तेढ पसरविण्यासाठी अनेक दहशतवादी कृत्ये करण्याचा कट रचला होता. रिझवानला पकडण्यासाठी माहिती देणाऱ्याला 3 लाख रुपयांचं बक्षीस होतं.

**जम्मू-काश्मीर**

दहशतवादाला करण्यात येणाऱ्या वित्तपुरवठ्याच्या चौकशीचा भाग म्हणून जम्मू आणि काश्मीरमध्ये राज्य तपास यंत्रणेनं जम्मू, दोडा आणि हंदवाडा इथल्या तीन ठिकाणी छापे टाकले. या छाप्यांमध्ये आभासी चलन अर्थात क्रिप्टोकरन्सीद्वारे दहशतवादाला खतपाणी घालण्यासाठी सीमापार निधी पुरवण्याच्या कटाचा समावेश असणाऱ्यांविररूद्ध कारवाई करण्यात आली. देशाविरुद्ध तरुणांना भडकवणाऱ्या व्यक्तींची ओळख पटवणं हा या तपास मोहिमेचा उद्देश होता असं जम्मू काश्मीरच्या राज्य तपास यंत्रणेनं म्हटलं आहे.

**अमेरिका-नाटो**

अमेरिकेनं नाटोसोबत युक्रेनला शस्त्रे पाठवण्याचा करार केला आहे. अशी माहिती अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत दिली. रशियाच्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांमध्ये अलिकडच्या काळात वाढ होत असताना युक्रेनला ती शस्त्रे पुरवण्यासाठी अमेरिका युरोपमधील त्यांच्या नाटो सहयोगी देशांना पॅट्रियट हवाई संरक्षण प्रणालींसह शस्त्रे विकणार असल्याचं ते म्हणाले. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी शस्त्रे वेळेवर पोहोचावीत यासाठी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी सकारात्मक चर्चा केल्याचं वृत्त नुकतंच प्रसारित झालं होतं. त्यानंतर ट्रम्प यांनी ही घोषणा केली. पॅट्रियट बॅटरी हल्ला करणाऱ्या क्षेपणास्त्रांना रोखण्यात मदत करतात. ती जगातील सर्वोत्तम हवाई संरक्षण प्रणालींपैकी एक मानली जातात.

**सीबीआय**

केंद्रीय अन्वेषण विभागायनं इंटरपोलद्वारे कुब्बावाला मुस्तफा याला संयुक्त अरब अमिरातीहून परत आणण्यात यशस्वीरित्या समन्वय साधला आहे. महाराष्ट्र राज्यातल्या सांगली इथली सिंथेटीक औषध निर्माण कंपनी परदेशातून चालवल्याच्या आरोपावरून तो मुंबई पोलिसांना हवा आहे. कुब्बावाला मुस्तफा आणि इतरांशी संबंधित असलेल्या

कारखान्यातून 25 लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीचे 126 किलोपेक्षा जास्त मेफेड्रोन हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला होता.

**CSC**

डिजीटल सशक्तीकरणासाठी काम करणाऱ्या एकत्रित सेवा केंद्र अर्थात CSC चा 16 वा स्थापना दिवस आज नवी दिल्लीत यशोभुमी इथं साजरा करण्यात येणार आहे. गृहमंत्री अमित शाह या कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. केंद्र सरकारच्या डिजीटल इंडिया अभियानाचा एक भाग आहे. गेल्या 16 वर्षांपासून ग्रामीण आणि शहरी भागात साडेसहा लाख केद्रांद्वारे डिजीटल सुविधा पुरवठादार म्हणून CSC नं जागतिक स्तरावर अव्वल स्थान पटकावलं आहे. या कार्यक्रमात सीएससीचा भविष्यातील कार्यपध्दतींचा लेखाजोखा मांडला जाईल. या नवीन टप्प्यात ग्रामीण भागात नवीन उपक्रम राबवणं आणि आत्मनिर्भर भारताचे उपक्रम राबवणं, कृत्रिम बुध्दीमत्ता-आधारित सेवा, क्लाऊड आधारित सेवा आणि डिजिटली सक्षम कार्यप्रणालीचं एकत्रीकरण अशा विविध मुद्यांचा समावेश असेल. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्यमंत्री जितिन प्रसाद कार्यक्रमाला उपस्थित असतील.

**शिवकालीन-किल्ले**

संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना अर्थात युनेस्कोने महाराष्ट्रातील 11 आणि तामिळनाडूतील जिंजी अशा एकंदर 12 शिवकालीन किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे. याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाने भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाकडे सादर केला होता. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि जिंजी यांचा समावेश होता. हा अतिशय ऐतिहासिक आणि अभिमानास्पद आणि गौरवपूर्ण क्षण असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**पुतळा अनावरण**

दुसऱ्या महायुद्धातील भारतीय वीर नायक यशवंत घाडगे यांच्या अतुलनीय शौर्यास श्रद्धांजली म्हणून इटलीमधल्या मॉन्टोन शहरात त्यांच्या कास्य पुतळ्याचं अनावरण करण्यात आले. 16 नोव्हेंबर 1921 रोजी महाराष्ट्रातील पालसगाव येथे जन्मलेले यशवंत घाडगे 3/5 मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटमध्ये नायक म्हणून कार्यरत होते. 10 जुलै 1944 रोजी अप्पर टायबर खोऱ्यातील लढाईत, शत्रूच्या मशीनगन हल्ल्यात सहकारी सैनिक ठार किंवा जखमी झाल्यानंतर, घाडगे यांनी एकट्याने शत्रूच्या मशीन गन पोस्टवर धाडसी हल्ला चढवला. ग्रेनेड आणि बंदुकीच्या बॅरलचा वापर करून त्यांनी शत्रू सैनिकांना नेस्तनाबूत केले, परंतु स्नायपरच्या गोळीबारात ते वीरमरण पावले. या शौर्यासाठी त्यांना मरणोत्तर 'विक्टोरिया क्रॉस' हा ब्रिटिश साम्राज्याचा सर्वोच्च लष्करी सन्मान मिळाला. या समारंभानं नायक घाडगे यांच्या बलिदानाची आठवण ताजी करत भारत-इटलीमधील मैत्रीपूर्ण संबंधांना बळकटी दिली आहे.

**नक्षलवादी**

छत्तीसगडमधल्या नारायणपूर जिल्ह्यात बावीस नक्षलवाद्यांनी काल पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं आहे. या नक्षलवाद्यांवर एकूण सदतीस लाख पन्नास हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. नवीन पुनर्वसन

धोरणांतर्गत आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्यांना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचं प्रोत्साहन आणि इतर सुविधा देण्यात येतील.

**<u>दिल्ली फटाकेबंदी</u>**

दिल्ली पोलिसांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मना पत्र लिहून राष्ट्रीय राजधानीत दिलीमध्ये फटाक्यांची ऑनलाइन विक्री त्वरित थांबवावी यासाठी दिल्ली पोलिसांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मना पत्र पाठवलं आहे. तसंच ग्राहकांना फटाक्यांची विक्री आणि वितरणावर बंदी घालण्याबाबत माहिती देणारी स्पष्ट सूचना प्रकाशित करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. तसंच याचं उल्लंघन केल्यास संबंधितांवर फौजदारी खटला चालवला जाईल, असंही सांगण्यात आलं आहे. दिल्लीतील वाढत्या प्रदूषणामुळे प्रभावित होणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचं रक्षण करण्यासाठी हे निर्देश एक महत्त्वाचं पाऊल असल्याचं पोलिसांनी म्हटलं आहे.

**<u>विम्बल्डन</u>**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत, कार्लोस अल्कराज यानं टेलर फ्रिट्झचा पराभव करून पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. दुसऱ्या सामन्यात, जागतिक अग्रणी यानिक सिन्नरने सात वेळा विजेता नोवाक जोकोविचचा पराभव करुन अंतिम फेरी गाठली. पाच वेळा ग्रँड स्लॅम विजेती, इगा स्वाटेक आज रात्री महिला एकेरीच्या विजेतेपदासाठी 13 व्या मानांकित अमांडा अनिसिमोवा हिच्यासोबत सामना करेल.

**<u>कसोटी-क्रिकेट</u>**

भारत-इंग्लडदरम्यानअँडरसन-तेंडूलकर कसोटी क्रिकेट स्पर्धेत तिसरा सामना काल चुरशीच्या अवस्थेत पाहोचला आहे. लंडनमधील लॉर्ड्स मैदानावर यजमान इंग्लंडविरुद्ध दुसऱ्या दिवशीभारताने 3 बाद 145 धावा केल्या आहेत. इंग्लंड संघ पहिल्या डावात 387 धावांवर सर्वबाद झाला. जसप्रीत बुमराहने पाच गडी बाद केले आणि विक्रमाची नेंद केली. पाच सामन्यांची कसोटी मालिका सध्या 1-1 अशी बरोबरीत आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.